# पुणे विद्यापीठ
# पुणे —४११००७
# महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

---

संदर्भ क्र. बी.सी.यु.डी/ओ.एस.डी/७४४ दिनांक:— ३०/०९/२०११.

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये
व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.

**विषय** : संशोधन प्रकल्प योजना (Research Project Scheme)

महोदय,

पुणे विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयामध्ये व मान्यता प्राप्त संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २००६—२००७, २००७—२००८ मध्ये अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्पांपैकी अपूर्ण व लेखे (Audit) सादर न केलेले संशोधन प्रकल्प व तसेच २००९—२०१० मधील अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्पांपैकी पहिल्या हप्त्याचे लेखे (Audit) सादर न केलेले संशोधन प्रकल्प या साठी केंद्रिय पध्दतीने लेखे स्विकारण्यासाठी जिल्हानिहाय शिबीर बोलविण्यात येत आहे.

सदर संशोधन प्रकल्पांसाठी दिनांक ७ ते १३ ऑक्टोंबर दरम्यान केंद्रिय लेखे शिबीर आयोजित केले होते. तथापि विद्यापीठातील संबंधीत कर्मचाऱ्यांची जनगणनेच्या कामासाठी नियुक्ती झाल्यामुळे केंद्रिय लेखे शिबीर पुढे ढकलण्यात आले आहे. सदर केंद्रिय लेखे शिबीराचा कालावधी नंतर कळविण्यात येईल.

वर नमुद केलेल्या कालावधीसंदर्भात हिशेब सादर न केलेल्या संशोधक प्राध्यापकांची नावे संबंधीत महाविद्यालयांस कळविण्यात येत आहेत. याच कालावधीसाठी या व्यतीरिक्त अन्य प्राध्यापकांचे हिशेब शिल्लक राहिले असल्यास त्यांना त्याची कल्पना द्यावी व त्या संदर्भात ओ.एस.डी/बी.सी.यु.डी कार्यालयास कळवावे (Email: **osd_bcud@unipune.ac.in** / Contact No. **020-25601263**).

शिबीरास येताना सोबत सन २००७, २००८, २००९ हया कालावधीतील प्रकल्प मान्यता पत्र व प्रत्यक्षात अनुदान मिळाल्याचा चेक नंबर व रक्कम रूपये, लेखा प्रमाणपत्र (Audit Statement), मुळ देयके आणणे आवश्यक आहे. उपकरणे, साधने यांची Stock entry, पुस्तकांच्या ग्रंथालयातील नोंदीचा पुरावा व सर्व कागदपत्रांवर मा. प्राचार्यांची सही आवश्यक आहे. तसेच सन २००६—२००७, २००७—२००८ मध्ये अनुदान प्राप्त संशोधक प्राध्यापकांनी त्यांचा संशोधन प्रकल्प अहवाल (Research Project Final Report) जमा करणे आपेक्षित आहे.

कळावे,

डॉ. रविंद्र जायभाये
विशेष कार्याधिकारी, म.वि.वि.मं.